दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal


• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७३ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२३ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## वन नेशन,वन इलेक्शन,नो अपोझिशन

# ही मोदी सरकारची कार्यपद्धती

## भाजपने लोकशाही गोठवली-नाना पटोले




**मुंबई (वृत्तसंस्था)-लोकसभा निवडणुका जाहीर झालेल्या असताना विरोधकांशी सरळ दोन हात करण्याची हिम्मत भारतीय जनता पक्ष व नरेंद्र मोदी यांच्यात नाही म्हणून ते रडीचा डाव खेळत आहेत. पराभवाच्या भितीने घाबरलेले नरेंद्र मोदींनी केंद्रीय संस्थांना हाताशी धरून विरोधी पक्षांना संपवण्याचे कारस्थान सुरु केले आहे. याचाच भाग म्हणून झारखंडचे आदिवासी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक केली. कालच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केली. काँग्रेस पक्षाला निवडणूक लढवता येऊ नये म्हणून काँग्रेस पक्षाची खाती गोठवली आहेत. मोदी सरकारने फक्त काँग्रेसची खाती नाही तर या देशातील लोकशाही गोठवली असून वन नेशन, वन इलेक्शन, नो अपोझिशन ही मोदी सरकारची कार्यपद्धती आहे असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.**

या संदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, केंद्रातील भाजप सरकार चीन व रशियाच्या मॉडेलनुसार काम करत असून त्यांना देशात फक्त एकच पक्ष हवा आहे त्यांच्या या मॉडेलमध्ये विरोधी पक्षाला स्थानच नाही म्हणून ते विरोधी पक्षांना संपवण्यासाठी ते आपली पूर्ण ताकद लावून संविधानिक संस्था आणि तपासयंत्रणांचा गैरवापर करत आहेत. भाजपाचा कार्यकर्ता आयकर विभागाने काँग्रेस पक्षाची सर्व बँक खाती गोठवून काँग्रेसची आर्थिक कोंडी करण्याचा कपटी डाव खेळला आहे. भारतीय जनता पक्षासह कोणताही राजकीय पक्ष इन्कम टॅक्स भरत नाही. असे असताना फक्त काँग्रेस पक्षावरच आयकर विभागाने कारवाई करून ११ बँक खाती का गोठवली? काँग्रेसवर जशी कारवाई केली तशी भारतीय जनता पक्षावर कारवाई करण्याची हिम्मत या इन्कम टॅक्स विभागाने का दाखवली नाही ? २०१७-१८ साली काँग्रेस पक्षाला मिळालेल्या २१० कोटी देणग्यांचा मुद्दा आहे. काँग्रेस खासदारांनी पक्षाला १४ लाख ४९ हजार रुपये रोख दिले आहेत, हे कारण दाखवून इन्कम टॅक्स विभागाने १०६% दंड लावून काँग्रेस पक्षाच्या खात्यातून ११५ कोटी रुपये जबरदस्तीने काढून घेतले आहेत.यातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे.. टायमिंग.. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आयकर विभागाला पुढे करून काँग्रेस पक्षाची बँक खाती गोठवून आर्थिक कोंडी केली आहे. पक्षाकडे निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी पैसे नाहीत. १९९३-९४ साली सिताराम केसरी काँग्रेसचे कोषाध्यक्ष होते त्यावेळच्या देणग्यासाठी आता ३१ वर्षानंतर इन्कम टॅक्स विभागाने नोटीस पाठवली आहे. राजकीय पक्ष इन्कम टॅक्सच्या कक्षेत येत नाहीत हे मोदींना माहित आहे. भाजपने कधी इन्कम टॅक्स भरला आहे का? असा सवाल करून मोदी सरकार किती खालच्या पातळीवरचे राजकारण करत आहे हे दिसते, काँग्रेस पक्ष याप्रश्नी कोर्टात जाईल पण तोपर्यंत लोकसभा निवडणुका संपतील, असे पटोले म्हणाले.एकीकडे विरोधी पक्षाची आर्थिक कोंडी करायची आणि दुसरीकडे इलोक्टोरल बाँड मधून भाजपा मात्र कोट्यवधी रुपयांची खंडणी वसुल करत आहे. नरेंद्र मोदी या बाँडच्या माध्यमातून जगातील सर्वात मोठे खंडणीचे रॅकेट चालवत आहेत. इलोक्टोरल बाँडच्या माध्यमातून देणग्या दिलेल्या बहुतेक कंपन्या बोगस आहेत. ईडी, सीबीआय आणि इन्कम टॅक्स विभागाचे छापे टाकून कंपन्यांकडून जबरदस्तीने खंडणी गोळा केली आहे. लोकशाही व्यवस्थेत स्वतंत्र व निष्पक्ष वातावरणात निवडणुका झाल्या पाहिजेत पण मोदी सरकार विरोधकांना संपवत आहेत. भारतीय जनता पक्षाचा दारूण पराभव होत असल्याचे चित्र देशात स्पष्ट दिसत आहे म्हणूनच मोदी-शाह टोळीच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मोदी सरकारच्या पापाचा घडा आता भरला आहे. हुकूमशहाचा अंत जवळ आला आहे तशी शेवटची धडपड सुरु झाली आहे पण जनता या हुकूमशाहीचा अंत करुन लोकशाही व्यवस्थेचे सरकार देशात आणल्याशिवाय गप्प बसणार नाही असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## चाहूल होळी सणाची





रंग रंगोटी झाडे फुलली..वसंताच्या प्रहरी लागली..चाहूल लागता होळी सनाची मूल नगरी गाठ्याने सजली (रोहित कामडे मूल)

## केजरीवालांच्या रिमांडवर सुनावणी झाली, पण निर्णय ठेवला राखून

नवी दिल्ली **(वृत्तसंस्था)**-मद्य धोरण प्रकरणी ईडीने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना शुक्रवारी दुपारी २ वाजता राऊस एव्हेन्यू न्यायालयात हजर केले. त्याच्या कोठडीवर सुनावणी सुरू झाली आहे. तपास यंत्रणेने १० दिवसांची कोठडी मागितली आहे.

दिल्ली दारू धोरण तयार करण्यात केजरीवाल यांचा थेट सहभाग असल्याचे ईडीने म्हटले आहे. रोख रक्कम दोनदा हस्तांतरित करण्यात आली. आधी १० कोटी आणि नंतर १५ कोटी रुपये देण्यात आले. केजरीवाल यांना पंजाब आणि गोवा निवडणुकीसाठी निधी हवा होता. गोव्याच्या निवडणुकीत ४५ कोटी रुपये वापरले गेले.तत्पूर्वी केजरीवाल यांनी अटकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. काही वेळातच केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयाला न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी आणि न्यायमूर्ती एमएम सुंदरेश यांच्या खंडपीठासमोर अर्ज मागे घेण्याची विनंती केली.केजरीवाल यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी कोर्टाला सांगितले.



सूर्य अस्तास आल्यावर गुरे आपल्या घरी परत येत असतानाचे मनमोहक चित्र. छाया :प्रणय बांगरे.

## केजरीवाल यांची अटक ही दडपशाही

## कॅबिनेट डिसीजनमध्ये चौकशी करु शकता का?-प्रकाश आंबेडकर

**अकोला (वृत्तसंस्था)**-मंत्रिमंडळात झालेल्या निर्णयावर तुम्ही प्रश्न विचारू शकता का? हे आधी न्यायालयाने ठरवायला हवे. हा फंडामेंटल इश्यू आहे, असे मी मानतो, असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या झालेल्या अटकेचा निषेध केला आहे. ईडीने केलेली कारवाई ही एक प्रकारची दडपशाही असल्याचा आरोप देखील ड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून केंद्र सरकारवर टीका केली.



या संदर्भात ड. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'कोर्टाने पहिल्यांदा ठरवलं पाहिजे की कॅबिनेट डिसीजनमध्ये झालेल्या निर्णयावर तुम्ही प्रश्न विचारु शकता का? चौकशी करु शकता का? हे बेसिक आहे. संविधानामध्ये कॅबिनेट नोट किंवा कॅबिनेट डिसिजन हे असताना तुम्हाला कोर्टामध्ये कॉल करता येत नाही. जेव्हा कोर्टामध्ये कॉल करता येत नाही. तेव्हा चौकशीसुद्धा होत नाही. हा फंडामेंटल इश्यू आहे, असे मी मानतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ते पहिल्यांदा ठरवावं, ही माझी सर्वोच्च न्यायालयाला विनंती आहे. ईडीला या पॉलिसी डिसीजनच्या प्रकरणात जाता येत नाही. त्यामुळे ही एका प्रकारची दडपशाही आहे.'

## गुन्हेगारी प्रवृतीवर आळा घालु-एस.एस.भगत

### पत्रकारांशी औपचारीक चर्चे दरम्यान व्यक्त केले मत

**मूल । प्रतिनिधी**

इतरांना त्रास होईल असा पध्दतीने सुसाट वेगाने वाहन चालवीणाऱ्या युवकांवर पोलीस प्रशासनाची करडी नजर राहणार आहे, बस स्थानकावर विनाकामाने टवाळक्या करणाऱ्यांवर कारवाई करून गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालु असे मत मूलचे उपविभागीय पोलीस अधिकारी एस. एस. भगत यांनी पत्रकारांच्या औपचारीक चर्चे दरम्यान व्यक्त केले.



अमरावती जिल्हयात उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन अनेक वर्षे सेवा दिल्यानंतर एस. एस. भगत यांची मूल येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन बदली झाली. ते १८ मार्च पासुन मूलचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन कामकाज बघत आहेत. मूलच्या पत्रकारांनी त्यांचे स्वागत केले असता त्यांनी पत्रकारांशी मनमोकळया गप्पा मारल्या. यावेळी अनेक विषयांवर चर्चा झाली, दरम्यान होवु घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त, आचारसहितेंचे नागरीकांकडुन काटेकोरपणेपालन होण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाकडुन प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगीतले, यासोबतच अवैध दारूविक्री, वाहतुक, जनावरांची अवैध तस्करी, सुगंधीत तंबाखु विक्रीवर आळा घालण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असेही ते म्हणाले. ३१ वर्षे पोलीस प्रशासनामध्ये कामकाम करीत असताना जवळपास दिडशे खुनाच्या गुन्हाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी एस. एस. भगत यांनी केलेला आहे. बहुतांष गुन्हे हे मनभेद, मतभेदामुळेच होत असतात, त्यामुळे शब्दावर नियंत्रण ठेवले पाहिजे, जो शब्दावर नियंत्रण ठेवतो तो शिखर गाठु शकतो असा सल्लाही त्यांनी यानिमीत्याने जनतेला दिला आहे.यावेळी व्हाईस ऑफ मिडीयाचे जिल्हाध्यक्ष संजय पडोळे, जिल्हा कार्याध्यक्ष गुरूदास गुरनुले, जिल्हा प्रसिध्दीप्रमुख भोजराज गोवर्धन, तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार, जिल्हा सदस्य अशोक येरमे, रमेश माहुरपवार, विनायक रेकलवार उपस्थित होते.

वाहन तुमचे
वाहनांची जबाबदारी आमची
तुमच्या सर्वप्रकारच्या इन्शुरन्ससाठी आजच भेट द्या!



Zero Depth/Comprehensive Policy / 3rd Party Policy
टु-व्हीलर, थ्री व्हीलर, फोर व्हीलर
इन्शुरन्स काढून मिळेल.
सह्यांद्री मल्टिसर्व्हिसेस,वरोरा.९०११७०८८४०

## उसगाव येथील अपघातात मृत्यु झालेल्या मोहन राजुरकर याच्या कुटुंबीयांची आमदार किशोर जोरगेवार यांनी घेतली सांत्वनपर भेट

**उसगाव । प्रतिनिधी**

स्कुल बसच्या धडकेत उसगाव येथील मोहन राजुरकर या २६ वर्षीय युवकाचा मृत्यु झाल्याची घटना १८ मार्च ला उसगाव कॉर्नर जवळ घडली होती. या अपघातात दोघे जखमी झाले आहे. दरम्यान आज आमदार किशोर जोरगेवार यांनी उसगाव येथील मृतक मोहनच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली आहे. यावेळी सदर कुटुंबाला आर्थिक मदतही केली.



कामानिमित्त तीन मित्र दुचाकीने उसगांव वरून निघाले होते. दरम्यान उसगाव कॉर्नर जवळ एका खाजगी स्कुल बसने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात २६ वर्षीय मोहन राजुरकर यांचा जागीच मृत्यु झाला तर दोन जन जखमी झाले आहे. यातील एकावर चंद्रपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. तर एकाला नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.


दरम्यान आज शुक्रवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी उसगांव येथील मृतक मोहन राजुरकर यांच्या कुटुंबींयाची भेट घेतली आहे. यावेळी मृतकाच्या वडिलांनी घडलेल्या प्रकाराबाबत माहिती दिली. अपघात झालेला मार्ग बंद होता मात्र एससीसी कंपणीने हा मार्ग सुरु केला. त्यामुळे हा अपघात झाला असल्याचा आरोप यावेळी कुटुंबीयांनी केला. आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी घुग्घुस ठाणेदार यांना दुरध्वनी वरुन संपर्क साधत घडलेला प्रकार समजून घेतला. सदर प्रकरणाची योग्य चैकशी करण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर यांनी केल्या आहे.

# अमर शहीदांचे अजरामर बलिदान!

**लाहोर खटल्याचा निकाल लावण्यात येऊन शिवराम राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना अतिशय गुप्तता राखत फाशी देण्यात आली. दि.२३ मार्च १९३१च्या सायंकाळी राजगुरू, भगतसिंग व सुखदेव हसत हसत फाशीला सामोरे गेले. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यात सतलज नदीच्या काठी हुसेनीवाला येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या तिघांच्या बलिदानाचा २३ मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो. अमर शहीदांचे अचाट अजरामर शौर्य श्री एन. कृष्णकुमार यांच्या शब्दशैलीतून वाचा... संपादक.**


नोव्हेंबर १९२८मध्ये भगतसिंग आणि त्यांचे सहकारी शिवराम राजगुरू यांनी २१ वर्षीय ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन सॉँडर्सला लाहोर येथे गोळ्या घालून ठार मारले. जेम्स स्कॉट यांना ठार मारण्याचा हेतू असताना चुकून सॉँडर्स बळी पडला. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट याने हिंदुस्थानातील लोकप्रिय राष्ट्रवादी नेते लाला लजपत राय यांच्यावर लाठी चार्जचा आदेश देऊन त्यांना जबर जखमी केले. त्यामुळे लाला लजपत राय दोन आठवड्यांनंतर मरण पावले. त्यांच्या मृत्यूचा बदला म्हणून भगतसिंगांनी स्कॉटला मारण्याचा बेत केला होता. त्याच्या या कटात चंद्रशेखर आझाद व शिवराम हरी राजगुरू सहभागी होते. त्यानंतर भगतसिंग व राजगुरू यांचा शोध घेत असल्याचे पाहून चंद्रशेखर आझाद यांनी चानन सिंघ नावाच्या भारतीय पोलिस अधिकाऱ्याला मारले.

भगतसिंग: हे एक भारतीय क्रांतिकारक होते. हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन हिंसात्मक कार्यांमुळे वयाच्या २३व्या वर्षी त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. भगतसिंगांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९०७ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतातील ल्यालंपूर जिल्ह्यातील बंगा गावात झाला. त्याच्या आईचे नाव विद्यावती व वडिलांचे किशनसिंग होते. ज्यावेळेस त्याच्या वडिलांची व दोन काकांची तुरुंगातून सुटका झाली, त्याच सुमारास भगतसिंगांचा जन्म झाला. त्यांच्या कुटुंबातील बरेच सदस्य भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले होते, तर काही महाराजा रणजितसिंगाच्या सैन्यात होते. काही कुटुंबीय सामाजिक कार्यांमध्ये सक्रिय होते. त्याचे वडील व काका हे करतारसिंग साराभाई व हर दयाल यांच्या गदर पार्टीचे सदस्य होते. दि.९ सप्टेंबर १९२५ रोजी भगतसिंगांच्या पुढाकाराने व आग्रहाने क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे नाव हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन असे ठेवण्यात आले. असोसिएशन हा भाग समाजप्रबोधन, माहितीपत्रके, साहित्य सामग्रीची जमवाजमव, भूमिगतांना आश्रय देणे यासाठी तर आर्मी हा भाग प्रत्यक्ष क्रांतिकार्यासाठी असे विभाजन केले गेले. हुतात्मा चंद्रशेखर आझाद हे मुख्य समन्वयक व सेनेचे मुख्य सेनापती तर भगतसिंग यांच्यावर



संघटनेचे समन्वयक व दोहोंचे सदस्य व नियंत्रक अशी कामगिरी सोपविली गेली. या संघटनेचे स्वप्न व एकमेव ध्येय म्हणजे सशस्त्र क्रांतीद्वारे इंग्रज सरकार उलथून टाकून भारतीय संघराज्याची स्थापना केली. खून करून, दरोडे घालून वा चार इंग्रजांना ठार करून काही स्वातंत्र्य मिळणार नाही असा त्यांचा उपहास वा धिक्कार केला गेला, तरी प्रत्यक्ष त्यांचे कार्य हे साक्षात राजसत्ता उलथून टाकण्यासाठी केलेले एक योजनाबद्ध स्वातंत्र्यसमर होते. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे अभियोगात सरकारने ठेवलेले आरोपपत्र होय.

शिवराम हरी राजगुरू: शिवराम राजगुरू हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात फाशी गेलेले क्रांतिकारक होते. ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या क्रांतिकार्यात सहभागी झाले होते. डॉक्टर हर्डीकर यांच्या सेवा दलामध्ये असतानाच त्यांचा संबंध हा हिंदुस्तान रिपब्लिकन पार्टी या क्रांतिकारी संघटनेशी आला. चंद्रशेखर आझाद, भगत सिंग आणि सुखदेव अशा क्रांतिकारकांच्या सहवासात आल्याने ते सशस्त्र उठाव करण्यास प्रेरित झाले. नॅशनल बँकेची लूट, क्रांतिकारक जोगेश चंद्रा चॅटर्जी यांची सुटका यांतही त्यांचा सहभाग होता. राजगुरूंचा जन्म पुण्याजवळ खेड येथे दि.२४ ऑगस्ट १९०८ रोजी एका मराठी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांना रघुनाथ या नावानेही ओळखले जात असे. लहानपणी १४व्या वर्षी इंग्रजी विषयातील अपयशामुळे वडील भावाने आपल्या नवविवाहित वधूसमोर त्यांना इंग्रजी धडा वाचायची शिक्षा केली. हा अपमान राजगुरूंना सहन झाला नाही. अंगावरच्या कपड्यांनिशी आईने तेल आणण्यासाठी दिलेले ९ पैसे व बहिणीने अंजिरांसाठी दिलेल्या २ पैशांसह त्यांनी आपले घर सोडले. शिक्षणासाठी ते आधी नाशिक आणि त्यानंतर थेट काशीलाच पोहचले. काशीतील त्यांचा बराचसा वेळ हा लोकमान्य टिळक ग्रंथालयत, महाराष्ट्र विद्या मंडळातील व्याख्याने- वादविवाद ऐकण्यात आणि भारतसेवा मंडळाच्या व्यायामशाळेत लाठी-काठी, दांडपट्टा यांच्या शिक्षणात जात होता. त्याकाळी कलकत्ता, पाटणा, कानपूर, लखनौ, झांशी, मीरत, दिल्ली, लाहोर ही गावे क्रांतिकारकांची माहेरघरे होती.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

काशी येथील पं.मदनमोहन मालवीयांचे हिंदू विद्यापीठ हेच साऱ्यांचे आश्रयस्थान व गुप्त केंद्र होते. राजगुरूंची भारताला खरी ओळख झाली ती सॉँडर्सच्या वधाच्या वेळी!सुखदेव: सुखदेव हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांचे मूळ नाव सुखदेव रामलाल थापर होते. त्यांचा जन्म लुधियानातील चौरा बाजार येथे दि.१५ मे १९०७ रोजी झाला. या ठिकाणाला नऊ घर असेही संबोधतात. आईचे नाव शल्लीदेवी असे होते. त्यांनी पंजाबमध्ये क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली. किंग जॉर्जच्या विरोधात गुप्त मसलतीच्या योजनेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांना धमकावले. यामुळे ब्रिटिश सरकारविरुद्ध सुखदेव अशी स्थिती निर्माण झाली. सुखदेवांनी ल्यालपूर- पंजाब येथे सन १९२६पासून तरुणांना एकत्र जमविण्यास सुरुवात केली. त्यांनी 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन'च्या वाङ्मयाचा तरुणांत प्रचार केला. दिल्ली येथे सन १९२८मध्ये सर्व क्रांतिनेत्यांची गुप्त परिषद भरली. तीत हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन नावाची नवीन देशव्यापी संघटना उभारण्याचे ठरले. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग हे पंजाबतर्फे होते. यात शिव वर्मा, चंद्रशेखर आझाद आणि कुंदनलाल हे विद्यार्थीही होते. संघटनेच्या ठरलेल्या कार्यक्रमानुसार बॉँबची कवचे बनविण्यासाठी सुखदेव लाहोरला गेले. नंतर तयार बॉँबची चाचणी झांशी येथे घेतली. लाहोरच्या नॅशनल कॉलेजमधील अभ्यासिकेत सुखदेव यांनी हिंदुस्थानचा इतिहास, रशियन राज्यक्रांती या विषयांचा चिकित्सकपणे अभ्यास केला. जागतिक पातळीवरील क्रांतिकारक साहित्याचे विविध दृष्टिकोण त्यांनी अभ्यासले. कॉम्रेड रामचंद्र,भगतसिंग व भगवतीचरण व्होरा यांच्या मदतीने त्यांनी 'नौजवान भारत सभा' ही संघटना लाहोर येथे स्थापन केली. या संघटनेचे कार्यक्रम असे ठरविण्यात आले- १) स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे. २) तर्कसंगत वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करणे. ३) जातियतेविरुद्ध लढणे. ४) अस्पृश्यतेची प्रथा बंद करणे. या कार्यक्रमांत त्यांनी सक्रिय भाग घेतला. सन १९२९ साली लाहोर खटल्याबद्दल तुरुंगात असताना त्यांनी कैद्यांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीबद्दल उपोषण केले.लाहोर खटल्याचा निकाल लावण्यात येऊन शिवराम राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना अतिशय गुप्तता राखत फाशी देण्यात आली. दि.२३ मार्च १९३१च्या सायंकाळी राजगुरू, भगतसिंग व सुखदेव हसत हसत फाशीला सामोरे गेले. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यात सतलज नदीच्या काठी हुसेनीवाला येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या तिघांच्या बलिदानाचा २३ मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो.

!! भारतीय शहीद दिनी सर्व नामानाम हुतात्म्यांना मानाचा लवून मुजरा !!

# जन आधार सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला असल्याचा आरोप

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत सक्षम व नियमित बांधकाम विभाग (दक्षिण) चे कार्यकारी अभियंता यांना सक्तीच्या रजेवर पाठवून त्या ठिकाणी स्व-हितासाठी नेमलेल्या अवैध प्रभारी कनिष्ठ दर्जाच्या शाखा अभियंत्याच्या नेमणुकीची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी जन आधार सामाजिक संघटनेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना निवेदन देताना जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोटे समवेत अमित गांधी, दीपक गुगळे, निलेश सातपुते, शिरीष सातपुते, शहानवाज शेख, ऋषिकेश पवार आदी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, मागील दीड वर्षापासून जिल्हा परिषद बांधकाम विभाग दक्षिण या ठिकाणी कार्यकारी अभियंता या पदावर मा.वंदेश उरांडे यांची शासनाने सक्षम व नियमित अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यांचा या नंतरही आणखी जवळपास आठ महिन्याचा कालावधी सेवानिवृत्ती होण्यासाठी बाकी आहे .परंतु मागील आठ दिवसापूर्वी अचानकपणे त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सक्तीच्या रजेवर पाठवले व त्या ठिकाणी कार्यकारी अभियंता दक्षिण



पदावर प्रभारी म्हणून प्रशांत ध्रुपद या कनिष्ठ दर्जाच्या आणि वादग्रस्त शाखा अभियंत्याची निवड केली गेली. कार्यकारी अभियंता या पदावर प्रभारी म्हणून अधिकारी नेमणूक करण्यासाठी ते पद रिक्त असूनही शासन स्तरावर नवीन अधिकारी उपलब्ध होत नसेल तर ते पद नव्याने अधिकारी नियुक्त होईपर्यंत काही ठराविक कालावधीपर्यंतच प्रभारी म्हणून सक्षम आणि समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यास देता येते. तसेच जिल्हा परिषदेच्या इतर विभागातील समकक्ष अधिकाऱ्याचीच नेमणूक अशा पदावर करता येते ज्या अधिकाऱ्यास प्रभारी म्हणून नियुक्ती दिली जात आहे. तो यापूर्वी किमान उपअभियंता या पदावर कार्यरत असावा तसेच जिल्ह्यातील उपअभियंता सेवाश्रेष्ठता यादीमध्ये देखील अव्वल स्थानावर असावा . तसेच तो जिल्हा परिषद विभागातील इतर समकक्ष विभागांमध्ये कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असावा मात्र यावेळी कार्यकारी अभियंता दक्षिण हे पद प्रभारी म्हणून देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्व-हितासाठी हे पद मर्जीतील दुय्यम अधिकाऱ्यास शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसून दिल्याचे निदर्शनास येत आहे. याच मुख्य कारण म्हणजे या पदावर जिल्हा परिषद विभागातील इतर कार्यकारी अभियंत्यांना प्रभारी पद देणे गरजेचे होते. परंतु आज कार्यकारी अभियंता दक्षिण म्हणुन प्रशांत ध्रुपद यांची नेमणूक झालेली आहे ते यापूर्वी कधीही कुठल्याही तालुक्यामध्ये उपअभियंता म्हणून कार्यरत नव्हते. मागील काही महिन्यापूर्वीच पारनेर तालुक्यात बांधकाम विभागांमध्ये शाखा अभियंता या पदावर ते कार्यरत होते. त्यानंतर साधारण अडीच महिन्यापूर्वी त्यांची जिल्हा परिषद बांधकाम विभाग उत्तर येथे पी.ओ. (प्रकल्प अभियंता )या पदावर नेमणूक करण्यात आली. या पूर्वी कार्यकारी अभियंता (दक्षिण) मा.वंदेश उराडे कोणाचीही मनमर्जी न चालून देता व्यवस्थितरित्या नियमानुसार काम करत होते त्यांना जाणून-बुजून सक्तीच्या रजेवर पाठवून त्या ठिकाणी स्व-हितासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी एका कनिष्ठ दर्जाच्या शाखा अभियंत्यास, जो पारनेर तालुक्यात शाखा अभियंता काम करत असताना वादग्रस्त अधिकारी म्हणून प्रख्यात होता अशा अनुभवहींन व्यक्तीला जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या सर्वोच्च पदावर रात्रीतून घडामोडी होऊन विशेष कृपा आशीर्वादाने का बसवले गेले? या सर्व घटनेची सखोल चौकशी होऊन या घटनेस जबाबदार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी करून निलंबित करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे..

# गुजरात ला हरवत महाराष्ट्राची विजयी सलामी ७० व्या वरिष्ठगट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा सुरु

**अहमदनगर । प्रतिनिधी**

४८ विरुद्ध ३१ च्या फरकाने गुजरात कबड्डी संघावर मात करीत महाराष्ट्र कबड्डी संघाने विजयी सलामी दिली. नगरच्या वाडिया पार्क मैदानावर ७० व्या वरिष्ठ गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे आज सायंकाळी शानदार उदघाटन मान्यवरांच्या उपस्थितीतझाले . चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील ३० संघ सहभागी झाले आहेत . या स्पर्धेचे उदघाटन अर्जुन पुरस्कार आणि शिव छत्रपती आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू अशोक शिंदे , तुषार आरोटे यांच्या हस्ते झाली .
आकाशात तिरंगे फुगे सोडुन पोलिस बॅन्डच्या निनादात उदघाटन करण्यात आले . राष्ट्रीय कबड्डी फेडरेशन, राज्य कबड्डी संघ आणि स्पर्धेचा ध्वज फडकविण्यात आले. नारळ वाढवून मैदानाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर स्पर्धाना सुरुवात झाली. बरोबर ६ वाजता नियोजित वेळापत्रकाप्रमाणे स्पर्धा सुरु करण्यात आली. भारताच्या संघ निवडीतील प्रमुख रणजीत सिंग व मनप्रित सिंग, शिवसेना नगर दक्षिणचे संपर्क प्रमुख आ. सुनील शिंदे, गुजरात कबड्डी असोसिएशन चे प्रमुख दिनेश पटेल, पश्चिम बंगाल कबड्डी असोसिएशन चे प्रमुख शामल कुमार बासू राजा रणधीर सिंग, मुख्य आयोजक तथा राज्य कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष प्रा .शशिकांत गाडे उपस्थीत होते . सर्व संघाच्या कर्णधारांचे यावेळी संचलन करण्यात आले .सलामीला महाराष्ट्र विरूद्ध गुजरात , बीएसएनल विरूध्द भारतीय रेल्वे , गोवा विरुद्ध पश्चिम बंगाल , हरियाणा विरूद्ध उत्तराखंड यांच्यात सलामीचा सामना सुरू करण्यात आला . सर्व सामने वेळेवर सुरू करण्यात येत आहेत हे या स्पर्धेचे वैशिष्टय आहे . त्यानंतर तामिळनाडू विरुद्ध पुद्दुचेरी, चंदीगड विरुद्ध तेलंगणा, राजस्थान विरुद्ध झारखंड, कर्नाटक विरुद्ध छत्तीसगड असे सामने झाले. प्रास्तावीक करताना प्रा . गाडे म्हणाले की , नगरच्या क्रिडा वैभवात भर घालणारी हि स्पर्धा होत असुन यासाठी जिल्हयातील राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी , जिल्हा क्रिडा कार्यालय यांचे आयोजनासाठी सहकार्य मिळाले . देशाचा कबड्डी संघ नगरमध्ये निवडला जाणार हि नगरच्या दृष्टिने अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले .उदघाटन कार्यक्रमास माजी आमदार दादा कळमकर , माजी महापौर अभिषेक कळमकर , भाजपचे शहराध्यक्ष अभय आगरकर , भैय्या गंधे, विक्रम राठोड , बाळासाहेब बोराटे , संदेश कार्ले , राज्य क्रिडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे , अशोक बाबर तसेच राज्य कबड्डी संघटनेचे पदाधिकारी उपस्थीत होते .यावेळी जिल्हा हौशी कबड्डी संघटनेचे विजय मिस्कीन , जयंत वाघ , प्रकाश बोरूडे , सुधाकर सुंबे आदींनी उपस्थीतांचे स्वागत केले . सूत्रसंचालन राणा तिवारी यांनी केले.

# वालचंदनगर येथे कराटे बेल्ट परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना बेल्ट व प्रशस्तीपत्र वाटप

**नातेपुते । प्रतिनिधी**

शालेय कराटे अँड किक बॉक्सिंग अकॅडमीच्या वतीने कराटे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची कराटे कलर बेल्ट परीक्षा वालचंदनगर जिल्हा पुणे येथे नुकतीच संपन्न झाली. कराटे बेल्ट परीक्षेसाठी पुणे व सोलापूर जिल्ह्यातून ११० विद्यार्थी सहभागी झाले होते. या परीक्षेत नातेपुते ता. माळशिरस येथील २४ विद्यार्थी - विद्यार्थिनीं यांनी सहभाग नोंदवला होता. कराटे बेल्ट परीक्षेच्या उद्घाटनासाठी वालचंद कंपनीचे एच.आर. राहुल माने, प्राचार्य डोंबाळे मॅडम, महाराष्ट्र कमांडो फोर्सचे मनोज राऊत, पूणे जिल्हा कराटे प्रशिक्षक अनिल वाघेला, सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माळशिरस तालुका स्वयंसिद्धा नियंत्रक कराटे प्रशिक्षिका सविता राऊत हे मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांची कराटे यलो बेल्ट पासुन ब्राऊन बेल्ट पर्यंत सलग सहा तास शारीरिक व बौद्धिक परीक्षा घेण्यात आली. यामध्ये कराटे पंच, कराटे चॉप, स्टमक पंच, फेस ब्लॉक, साईड किक, थस किक, फिजिकल फिटनेस व काताज इत्यादी प्रकार घेतले. या घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये येलो बेल्ट मध्ये अन्वी चौगुले,



श्रेया शिंदे, अन्वी भूमाळे, संस्कुती इंडे,रूचा बिडवे,वेदिका माळी, प्रांजल चांगण, सोनल चौधरी, संतोषी चौधरी, समृद्धी शेंडे रिजान काझी प्रथमेश साळवे,रिहान काझी, मानस शेळके, प्रदिप चौधरी, विश्वराज मोरे ऑरेंज बेल्ट मध्ये श्रीराम उराडे ग्रीन बेल्ट मध्ये वरद कुचेकर, मोहित राऊत, स्वरा राऊत, प्रणवी झगडे, ब्ल्यू बेल्ट मध्ये सायली पांढरे, क्षितिजा प्रवार, ब्राऊन बेल्ट मध्ये स्वप्नाली मोरे या विद्यार्थी - विद्यार्थिनी यश संपादन केले.सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माळशिरस तालुका स्वयंसिद्धा नियंत्रक कराटे प्रशिक्षिका सविता राऊत यांच्या शुभहस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना बेल्ट व प्रमाणपत्र देण्यात आली. यावेळी बोलत असताना सविता राऊत म्हणाल्या की, शालेय मुले आणि मुलींमध्ये स्वतःचे संरक्षण करण्याबाबत आत्मविश्वास, धाडस निर्माण व्हावे, यासाठी नातेपुते येथे डॉ. बा. ज. दाते प्रशाला या ठिकाणी कराटे प्रशिक्षण वर्ग चालवले जातात.लहान मुले आणि मुली स्वतःचे संरक्षण स्वतः करू शकतील या उद्देशाने कराटे प्रशिक्षण घेणे काळाची गरज बनली आहे. स्कूल गेम कराटे अँड किक बॉक्सिंग अकॅडमीच्या माध्यमातून कराटे प्रशिक्षण देऊन अनेक विद्यार्थी घडविले. आज तेच विद्यार्थी अनेक मुला-मुलींना कराटे प्रशिक्षण देऊन धाडसी बनवत आहेत, ही स्वागतार्ह बाब आहे. कराटेमुळे मुलांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण होण्यास मोठी मदत होत असल्याचे मत सविता राऊत यांनी विदयार्थ्यांना कराटे बेल्ट व प्रशस्तीपत्र वाटप करत असताना व्यक्त केले. यावेळी सीनियर ब्लॅक बेल्ट प्रशिक्षक निखिल देसाई, अमित कुंभार, भक्ती परचंडे, तेजस्विनी शिरतोडे जानवी सोनवळ, वैष्णवी पदमन उपस्थित होते.

# पाच हजार रिक्षाचालकांना दिलासा; इंधन रूपांतर निर्णयामुळे वाहन स्क्रॅप करण्यासाठी मुदतवाढ



**सोलापूर :** शहरातील अंदाजे पाच हजार ऑटो रिक्षा चालकांना त्यांची रिक्षा स्क्रॅप करण्याऐवजी सीएनजी किंवा एलपीजी इंधन वापर रूपांतरामुळे वापरता येणार आहे. परिवहन खात्याच्या या आदेशाने रिक्षा चालकांना दिलासा मिळाला आहे.परिवहन खात्याने सध्या पेट्रोलवर चालणाऱ्या रिक्षांना सीएनजी किंवा एलपीजी इंधन वापराच्या रिक्षामध्ये रूपांतर केल्यास स्क्रॅपच्या कालावधीत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील रिक्षाचालकांना त्यामुळे आणखी पाच ते १० वर्षे रिक्षा वापरण्याची संधी मिळाली आहे. केवळ इंधन वापराचे तांत्रिक रूपांतर करण्याचा खर्च करून हे शक्य होणार आहे.काही वर्षात पेट्रोलच्या जादा दरामुळे रिक्षा चालकांना देखील आर्थिक नुकसान होत होते. पण स्क्रॅपची मुदत १५ वर्षाची असल्याने आहे त्या स्थितीत रिक्षा चालवण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नव्हता.इंधन वापराचे रूपांतर केले तरी स्क्रॅपच्या मुदतीत रिक्षा बंद करण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नव्हता. त्यातच नवीन रिक्षा खरेदीच्या बाबतीत देखील अडचणी होत्या. वाहन कर्जाचे मोठे व्याजदर, विमा संरक्षणाचा मोठा खर्च यामुळे रिक्षा चालक मेटाकुटीस आलेले आहेत. मात्र आता सीएनजी किंवा एलपीजी इंधन वापराच्या रूपांतराने मात्र काही वर्षासाठी त्यांना त्यांची जुनी रिक्षा आणखी काही काळ वापरता येणार आहे.

# आ.धस यांचे माजी उपनगराध्यक्ष नय्युम पठाण,अॅड.जब्बार पठाण सह क्रांतीनगर भागातील नागरिकांनी मानले आभार

## कालव्याचे बंदिस्तीकरण करुन कालव्याच्या दुरुस्तीसाठी ३ कोटी ७९ लक्ष रुपये निधी मंजूर

**पाटोदा | प्रतिनिधी**

पाटोदा शहरातून महासांगवी मध्यम प्रकल्पाचा कालवा (कॅनॉल)वार्ड क्रमांक १५ मधुन जात असून तो पूर्णपणे खराब झाला होता. तसेच या कॅनॉल मध्ये क्रांतीनगर परिसरातील काही भागाचे सांडपाणी सोडल्याने क्रांतीनगर भागातील नागरिकांना रोगराईचा सामना करावा लागत होता. या बाबतीत अनेक दिवसांपासून या कॅनॉलची दुरुस्तीची मागणी केली जात होती, परंतु या वर काहीच उपाय योजना होत नव्हती. परंतु आता स्वत: या प्रश्नाकडे विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांनी लक्ष घालून पाठपुरावा केला व या कालव्याचे बंदिस्तीकरण करुन उर्वरित कालव्याच्या दुरुस्तीसाठी ३ कोटी ७९ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिल्याने वार्ड क्रमांक १५ चे विद्यमान नगरसेवक माजी उपनगराध्यक्ष पठाण नय्युम भाई व अँड.जब्बार पठाण यांच्या सह क्रांतीनगर भागातील नागरिकांनी लोकनेते विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांचे आष्टी येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली व त्यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले. पाटोदा शहरातून जाणारा व वार्ड क्रमांक १५ क्रांतीनगर भागातुन वाहणारा महासांगवी मध्यम प्रकल्पाचा कालवा (कॅनॉल)पूर्णपणे खराब झाला होता, या मुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. मात्र आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पाठपुराव्यामुळे व प्रयत्नातून या कँनाॅलचे सीसी बॉक्स लाईनींग(अंडरग्राऊंड कालवा) करणे व इतर भागातील कालव्याला सीसी लाईनींग करून दुरुस्त करणे या साठी विशेष बाब म्हणून ३.८९ कोटी निधी सह प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या निमित्त आमदार सुरेश आण्णा धस याचे क्रांतीनगर च्या नागरिकांकडून आभार व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी क्रांतीनगर भागातील अँड. सय्यद अशरफ भाई, हाजी मजहर भाई, शिवाजी डिडूळ, अर्जुन जाधव, माऊली राऊत, बशीर भाई, अप्पासाहेब पानपट, हाजी अहमद भाई, अनिल माने, मुन्ना भाई, जमील भाई, राजू खोसे, पप्पू कोल्हे, विनोद राऊत, किशोर राऊत, सतीश गर्जे, रामदास फुंदे, यशपाल जावळे यांच्या सह मोठ्या संख्येने क्रांतीनगर भागातील नागरिक उपस्थित होते.



# आमदार प्रणिती शिंदेंसमोर मराठा तरुणांची घोषणाबाजी; गावागावां मध्ये सभा, बैठका घेण्यास विरोध

**पंढरपूर :** तालुक्यात गावभेट दौऱ्यावर असलेल्या आमदार प्रणिती शिंदे यांना मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून गावागावांमध्ये विरोधाचा सामना करावा लागला. कौठाळी, गोपाळपूर, सरकोलीसह काही गावांमध्ये एक मराठा, लाख मराठा अशी घोषणाबाजी करत मराठा तरुणांनी त्यांना गावामध्ये प्रवेश करण्यास विरोध केला. त्यामुळे त्यांना बैठक न घेताच माघारी फिरावे लागले. सरकोली येथे रात्री नऊच्या सुमार आमदार शिंदे आल्या असता गावात सभा घेण्यास मराठा बांधवांनी विरोध केला. तसेच पंढरपूर रस्त्यावर त्यांचा ताफा मराठा तरुणांनी अडविला. यावेळी आमदार शिंदे व मराठा आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली.आमदार प्रणिती शिंदे यांच्या दौऱ्यादरम्यान आज (बुधवार) पंढरपूर तालुक्यातील कौठाळी व गोपाळपूर गावात मराठा युवकांनी आरक्षणाच्या मागणीवरून आमदार शिंदे यांच्या समोर गोंधळ घातला.आमदार शिंदे आज सकाळी कौठाळी गावामध्ये गेल्या असता तेथील मराठा समाजातील युवकांनी एक मराठा, लाख मराठा अशा घोषणा देण्यास प्रारंभ केला. मराठा समाजाच्या युवकांचा रोष पाहता आमदार प्रणिती शिंदे यांनी गावातून बाहेर पडणे पसंत केले.त्यानंतर



गोपाळपूर येथेही आमदार शिंदे यांच्या बैठकीत मराठा समाजाच्या तरुणांनी घोषणाबाजी करत गोंधळ घातला. त्यामुळे त्यांना येथेही बैठक न घेताच माघारी फिरावे लागले. विविध गावात मराठा समाजाच्या रोषाला आमदार शिंदेंना जावे लागत आहे.तसेच सरकोली येथे रात्री नऊच्या सुमार आमदार शिंदे आल्या असता गावात सभा घेण्यास मराठा बांधवांनी विरोध केला. तसेच पंढरपूर रस्त्यावर त्यांचा ताफा मराठा तरुणांनी अडविला. यावेळी आमदार शिंदे व मराठा आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली.मराठा आरक्षणासाठी अनेक गावांनी राजकीय पक्षाच्या नेत्यांना गावबंदी केली आहे. त्यामुळे हा रोष वाढू लागला आहे. आज दुपारी मात्र गादेगाव येथील आमदार शिंदे यांची बैठक शांततेत पार पडली. येथे माध्यमांशी बोलताना त्यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी भाजप - शिवसेनेवर जोरदार टीका केली.आमदार शिंदे म्हणाल्या, भाजप सरकारच्या काळात महागाईने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे गोरगरिबांचे हाल सुरू आहेत. शेतकरी देशोधडीला लागला आहे. बेरोजगारी वाढली आहे. महिला सुरक्षित नाहीत. देश सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्रात बदल केला पाहिजे, असे आवाहन विठ्ठल साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी केले.यावेळी व्यापार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, सुरेश बागल, तानाजी बागल, समाधान फाटे, बजरंग बागल, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आमदार शिंदे म्हणाल्या, खरंतर मराठा समाजाने भाजपला विरोध केला पाहिजे. या सरकारने एक दिवसाचे अधिवेशन घेऊन खेळी केली आहे. त्यांना उघडं पाडण्याची वेळ आली आहे. भाजप पुन्हा खोटेनाटे सांगून लोकांची दिशाभूल करेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही गाव बंदी नव्हे तर घर बंदी केली पाहिजे, असे आवाहनही त्या यावेळी केले.

# पवारांच्या विरोधात लढत झाल्यास नशीबच–रणजितसिंह नाईक–निंबाळकर

**माढा:** देशाच्या राजकारणातील चाणक्य म्हणून शरद पवारांची ओळख आहे. माझे जेवढे वय आहे, तेवढा त्यांचा राजकारणातील अनुभव आहे. माढ्यातून शरद पवार यांनीच मैदानात यावे, असे आव्हान मी यापूर्वीच दिले आहे.

माढ्यातून महाविकास आघाडीतर्फे शरद पवार मैदानात उतरले तर माढ्याची लढत देशपातळीवर चर्चेची लढत होईल. पवारांच्या विरोधात लढायला मिळाल्यास माझे नशीबच, अशी माहिती माढ्याचे खासदार तथा भाजप उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी दिली.सोलापूरच्या दौऱ्यावर आल्यानंतर खासदार निंबाळकर यांनी 'सकाळ'च्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. खासदार निंबाळकर म्हणाले, माढा लोकसभा मतदार संघात आतापर्यंत झाली नव्हती, एवढी विकासकामे गेल्या पाच वर्षात झाली आहेत.मतदार संघातील एमआयडीसी आणि सिंचनाचा प्रश्न उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मार्गी लागले आहेत. या मतदार संघात केलेल्या कामांच्या जीवावरच मी पवारांना माढ्यातून लढण्याचे आव्हान दिले असल्याचेही त्यांनी सांगितले.खासदार निंबाळकर म्हणाले, धैर्यशील मोहिते-पाटील हे भाजपकडून लोकसभेची उमेदवारी मिळावी, यासाठी इच्छुक होते. उमेदवारी न मिळाल्याने ते व त्यांचे समर्थक नाराज झाले आहेत. मोहिते-पाटील यांना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी अनेक प्रकरणात मदत केली आहे.विधान परिषद दिली आहे. त्यामुळे ते उपमुख्यमंत्री फडणवीस यांची साथ सोडतील, असे वाटत नाही. भाजपने दिलेला आदेश ते नक्कीच पाळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.माढ्याची जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सोडणार असल्याचा मेसेज काहीजण व्हायरल करत आहेत. यामध्ये काहीही तथ्य नाही. माढ्याची जागा ही भाजपच लढणार आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वात अगोदर माझी उमेदवारी जाहीर केलेली आहे.पक्षाने केलेल्या सर्व्हेत मला मिळालेली पसंती ही सर्वाधिक असल्याने राज्यातील भाजप उमेदवारांच्या पहिल्या यादीत आपला समावेश झाला असल्याचे खासदार निंबाळकर यांनी सांगितले.

# डॉ.अशोक गावित्रे यांना दादासाहेब फाळके इंटरनेशनल सिने अवॉर्ड प्रदान

**शिर्डी | प्रतिनिधी**

२०२४ भारतीय चित्रपट व दुरचित्रवाहिनी क्षेत्रातील तंत्रज्ञ आणि कलाकाराना सर्वोत्तम कामगिरी बद्दल देण्यात येणारा दादासाहेब फाळके इंटरनेशनल सिने अकैडमी अवॉर्ड २०२४ पुरस्कार सोहळा नुकसान पुणे येथे संपन्न झ!ला ,याप्रसंगी अनेक मराठी तसेच हिंदी चित्रपट व सीरियल मधील कलकारानी उपस्थिति लावली ,या कार्यक्रमाचे उद्धघाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री व मराठी तसेच हिंदी चित्रपट स्रुष्टि गाजवनरे अभिनेते दीपक शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले ,या प्रसंगी बिगबॉस फेम् व सामाजिक कार्यकर्ता तृप्ति देसाई तसेच मोनालिसा बागल,प्रांजलि भालेराव तसेच जोतिबा फुले




यांच्या जीवनावर आधारित सत्यशोधक चित्रपटाची सम्पूर्ण टीम तसेच अनेक तंत्रन्य उपस्थित होते याप्रसंगी अनेक कलाकारांचा गौरव करुन पुरस्कार देण्यात आले.

या मधे शिर्डी येथील डॉ अशोक गावित्रे यांचा ही सामावेश असून त्यांना सर्वोकृष्ट सामाजिक विषय व दिग्दर्शन यासाठी दादासाहेब फाळके इंटरनेशनल सिने अकैडमी बेस्ट डिरेक्टर हा अवॉर्ड देवून सिने अभिनेते दीपक शिर्के व बिगबॉस फेम् तृप्ति देसाई यांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरवन्यात आले.

# जिल्ह्यात २ एप्रिलपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अहमदनगर | प्रतिनिधी**

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी त्यांना प्राप्त अधिकारानुसार संपूर्ण अहमदनगर जिल्हा महसूल स्थळ सीमेच्या हद्दीत महाराष्ट्र पोलीस अधिनियमाचे कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये जिल्ह्यात २० मार्च ते २, एप्रिल, २०२४ पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.या आदेशानुसार नमूद केलेल्या कालावधीत व ठिकाणी कोणत्याही इसमास पुढीलप्रमाणे कृत्ये करण्यास मनाई करण्यात आली आहे.शस्त्रे, मोटे, तलवारी, भाले, दंडुके, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जवळ बाळगणे, जमा करणे. जाहीरपणे घोषणा देणे, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, ध्वनीवर्धक किंवा ध्वनीक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणारा किंवा तो जसाच्या तसा ऐकवणारे उपकरण संच वापरणे किंवा वाजवणे, सभ्यता अगर नीतिमत्ता यास धक्का पोचेल किंवा शांतता धोक्यात येईल असे कोणतेही कृत्य करणे, आवेशपुर्ण भाषणे करणे, हावभाव करणे किंवा सोंग आणने अगर तशी चित्रे, चिन्हे किंवा इतर वस्तू तयार करणे किंवा त्यांचा प्रचार करणे. सार्वजनिक तसेच खाजगी ठिकाणी निवडणूक प्रचारार्थ तसेच अन्य कारणास्तव सभा घेण्यास, मिरवणुका काढण्यास व पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई केली आहे.शासकीय सेवेतील व्यक्तींना ज्यांना आपले वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यार जवळ बाळगणे आवश्यक आहे, तसेच ज्या व्यक्तींना शारिरीक दुर्बलतेच्या कारणास्तव लाठी अगर काठी वापरणे आवश्यक आहे. तसेच प्रेतयात्रा, धार्मिक कार्यक्रम, धार्मिक मिरवणूका, लग्न समारंभ, लग्नाच्या मिरवणूका हे कार्यक्रम, सभा घेण्यास अथवा मिरवणूका काढण्यास ज्यांनी संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची रितसर परवानगी घेतली आहे अशा व्यक्तींना हा आदेश लागु राहणार नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### १८ वर्षांवरील अनाथ मुलांच्या आयुष्यावर संशोधन करण्याकरिता तर्पण फाऊंडेशनतर्फे सुरु करण्यात आलेल्या

# तर्पण ऑर्फन रिसर्च अँड डेव्हलपमेंट अकॅडेमी (TORDAC) चे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन

**अहमदनगर | प्रतिनिधी**

अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत, परंतु जेव्हा ती मुले अनाथालयातून बाहेर येतात तेव्हा त्यांच्या समोर पुढील आयुष्याचे प्रश्नचिन्ह असते त्यासाठी त्यांना पाठिंबा देणारी कुठलीही संस्था नाही. अशा अनाथालयातून बाहेर पडणाऱ्या मुलांसाठी तर्पण फाउंडेशन ही संस्था मागील चार वर्षांपासून कार्यरत आहे. या अनाथ मुलांच्या शिक्षणाचा खर्च, नोकरी, त्यांची राहण्याची व्यवस्था, वेळोवेळी चांगले संस्कार देण्याची व्यवस्था तर्पण फाउंडेशनतर्फे केली जाते. तर्पण फाउंडेशनच्या माध्यमातून अनाथ मुलांवर रिसर्च करण्यासाठी तर्पण ऑर्फन रिसर्च अँड डेव्हलपमेंट अकॅडेमी TORDAC सुरु करण्यात आलेली आहे. या रिसर्च सेंटरचे उदघाटन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. या प्रसंगी भाजपचे आमदार नितेश राणे सुद्धा उपस्थित होते.या प्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनाथांच्या क्षेत्रात विशेषतः १८ वर्षानंतर अनाथालयाच्या बाहेर पडल्यावर अनाथ मुलांच्या समोर पुढील आयुष्यात जे प्रश्नचिन्ह उभे राहतात. ते प्रश्नचिन्ह दूर करून त्यांच्या आयुष्यात प्रकाश आणण्याचे काम तर्पण फाउंडेशन संस्थेतर्फे केले जाते. आपल्या सरकारच्या माध्यमातून अनाथ मुलांना १ टक्का आरक्षण आपण दिलेले आहे आणि आता तर्पण तर्फे जे रिसर्च फाउंडेशन सुरु झालेले आहे, हे अनाथ मुलांसाठी काम करणारे हे जे क्षेत्र आहे या क्षेत्रामध्ये मूलभूत रिसर्च या फाउंडेशनच्या माध्यमातून होईल आणि त्यातून या क्षेत्रामध्ये नवीन धोरणे तयार करण्याकरिता व अनाथांच्या क्षेत्राला नवीन दिशा देण्याकरिता एक महत्वाचे कार्य याच्या माध्यमातून होणार आहे. यावेळेस बोलताना तर्पण फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीकांत भारतीय म्हणाले की, तर्पण फाउंडेशन ही एक एनजीओ आहे. बालगृहातून बाहेर पडलेल्या अनाथ मुलांसाठी, त्यांचे सशक्तीकरण करण्यासाठी आणि त्यांनी आयुष्यामध्ये येणाऱ्या सर्व आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्याची एक सामर्थ्यवान शक्ती त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी काम करणारी एक एनजीओ आहे. आम्ही मागील चार वर्षांपासून या क्षेत्रामध्ये काम करत आहोत. मुलगा बालगृहामध्ये वयाच्या १८ वर्षांपर्यंत असतो. पण १८ वर्षानंतर त्याला बालगृह सोडावे लागते. १८ वर्षांपर्यंत अनाथ मुलांसाठी काम करणाऱ्या त्यांना सोयीसुविधा पुरविणाऱ्या खूप संस्था आहेत आणि त्याचबरोबर सरकारच्या माध्यमातून सुद्धा अनाथ मुलांच्या जगण्यासाठी आणि शिक्षणासाठी खर्च केला जातो. परंतु जेव्हा मुले अनाथालयातून बाहेर येतात. परंतु ऑरगॅनिझड पद्धतीने, डेटा बेस्ड संशोधन करून, डोळ्यासमोर व्हिजन ठेऊन काम करणारी दुर्दैवाने एकही संस्था नाही. १८ वर्षानंतर अनाथालयातून बाहेर पडणाऱ्या मुलांची एक कम्युनिटी आहे. तिचा कुणी अभ्यासच केलेला नाही. मागील चार वर्षांपासून आम्ही १८ वर्षानंतर



अनाथालयातून बाहेर पडणाऱ्या मुलांसाठी काम करत आहोत. आम्ही १२६१ मुले दत्तक घेतली आहेत. आम्ही या मुलांच्या शिक्षणाचा खर्च, नोकरी, राहण्याची व्यवस्था केली आहे आणि वेळोवेळी या मुलांच्या संस्काराची देखील व्यवस्था केली आहे. श्रीकांत भारतीय पुढे म्हणाले की, आम्ही चार वर्षे अनाथ मुलांसाठी तर्पणच्या माध्यमातून काम करतो. त्यातून आम्हाला लक्षात आले की, अनाथ मुलांवर कोणत्याही प्रकारचे रिसर्च आजवर कुणी केलेले नाही. त्यामुळे आज माननीय देवेंद्रजींच्या हस्ते आम्ही आज तर्पण फाउंडेशनच्या TORDAC (Tarpan Orphan Research and Development Academy) चे आज उद्घाटन केले. ज्यावेळेस देवेन्द्रजी मुख्यमंत्री होते त्यावेळेस प्रस्ताव ठेवला गेला. त्यावेळेस लक्षात आले की अनाथालयातून बाहेर पडलेल्या मुलाला कोणती जात व धर्म नसतो. मग तो किंवा ती ओपन मध्ये कशी, मग ती शेड्यूल्ड कास्ट कशी असणार. त्यामुळे समांतर आरक्षणाच्या कक्षेमध्ये आपण अनाथ मुलांच्या आरक्षणाचा आग्रह धरला आणि यासाठी देवेन्द्रजी मुख्यमंत्री असताना १% समांतर आरक्षणाचा निर्णय झाला. त्यातून अशा बऱ्याच अनाथ मुलांना फायदा झाला आहे. या निर्णयामुळे तर्पण फाउंडेशनने दत्तक घेण्यात आलेली पाच मुले पोलीस निरीक्षक होत आहेत. एक मुलगा आरएफओ झालाय. एक मुलगी लंडन ला गेलेली आहे. एक मुलगा एमबीबीएस करत आहे. ३८ मुले कॉन्स्टेबल झालेली आहेत आणि कित्येक मुली नर्सिंगचा कोर्स करत आहेत. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी अनाथ मुलांच्या विषयाच्या माध्यमातून तर्पणशी जोडल्या गेलेल्या आहेत. त्यांनी देशभरामध्ये तर्पण फाऊंडेशनच्या माध्यमातून काम करण्यासाठी अपील केले आहे. रिसर्चच्या माध्यमातून अनाथांसाठी जे कार्य आपण महाराष्ट्रात सुरु केले आहे. ते कार्य आपण केंद्र सरकारच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात घेऊन जाणार आहोत. जेणेकरून देशभरातील अनाथालयामधून बाहेर पडणाऱ्या १८ वर्षांवरील मुला-मुलींच्या आयुष्यात तर्पणच्या माध्यमातून काही प्रकाश आणता येईल, यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. यामध्ये ढजठऊ-उ ची खूप मोठी भूमिका असणार आहे आणि बहुधा आम्ही जून-जुलैच्या कालावधीत ऑल इंडिया कॉन्फरन्स करणार आहोत, असे श्रीकांत भारतीय यांनी सांगितले.


## मोदींची विचारसरणी औरंगजेबासारखी

# कत्तलखाने, गोमांस निर्यातदारांकडून निवडणूक रोखे घेतल्याचा दावा-ठाकरे

**बुलढाणा (वृत्तसंस्था)**–मोदींची विचारसरणी औरंगजेबासारखी आहे, अशी तिखट टीका संजय राऊत यांच्यानंतर आता उद्धव ठाकरे यांनी केली आहे. त्यामुळे आरोप–प्रत्यारोपाला पुन्हा एकदा धार येणार आहे. ठाकरे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी शहांवर देखील टीकास्त्र सोडले.

कत्तलखाने आणि गोमांस निर्यात करणाऱ्या कंपन्यांकडून निवडणूक रोखे घेऊन भाजप हिंदुत्व शिकवणार असेल तर जनता तुम्हाला निवडणुकीत कापल्याशिवाय राहणार नाही, असा हल्लाबोल ठाकरे यांनी केला.

उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, ज्या शिवसेनेने तुम्हाला सत्तेची गादी दाखवली त्या शिवसेनेला तुम्ही संपवायला निघालात. भाजपवाले स्वातंत्र्य लढ्यात कधीच नव्हते. मग तुमच्याकडून आम्ही काय शिकायचं? गद्दारी का अशी विचारणा केली. ते म्हणाले की त्यांच्याकडे प्रचंड धनसंपत्ती आहे पण माझ्याकडे जनसंपत्ती आहे. ज्या गद्दारांना शिवसैनिकांनी आमदार खासदार केले होते त्याच गद्दारांना आता माझा शिवसैनिक या मातीत गाडणार असल्याचे ते म्हणाले. ज्या शिवसेनाप्रमुखांच्या शिवसैनिकांनी तुम्हाला निवडून दिले त्यांच्यावर तुम्ही खोट्या केसेस दाखल करता, फक्त थोडे दिवस थांबा, असा इशारा त्यांनी दिला.उद्धव ठाकरे म्हणाले की, भाजप सातत्याने हिंदुत्वाच्या नावाने बोलत असते. मात्र, यांच्याकडे आहे तरी काय? देशप्रेम सांगत असाल, तर आम्ही सगळा इतिहास काढू. भाजपचे बाप जादे सुद्धा स्वातंत्र्यलयात नव्हते अशी बोचरी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. ते पुढे म्हणाले की तुमच्याकडून शिकायच तरी काय? गद्दारी? भाजपने



अनेकांना गद्दार केले. दोन पक्ष फोडून आलो सांगतात याची लाज वाटली पाहिजे. हिंदुत्वाच्या वेडापायी आम्ही निवडून देत होतो याचीच लाज वाटते असे उद्धव ठाकरे म्हणाले.सिंदखेडराजामधील सभेमध्येही उद्धव ठाकरे यांनी भाजपवर तोफ डागली. ते म्हणाले की मला तुम्ही कुटुंबप्रमुख मानलं. मी सांगितलेलं ऐकलं म्हणून कोरोना काळात आपण वाचू शकलो. आताही सांगतोय भाजपच्या भूलथापांच्या नादी लागू नका. हुकुमशाहीला आजच गाडून टाका असे ते म्हणाले. मी तुम्हाला तळमळीने सांगतो यावेळी चूक करू नका. गद्दारीला मते देऊ नका, समोर हुकूमशाहीचं संकट असल्याचे ते म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की दुसऱ्या धर्माचा आहे म्हणून त्याला मार हे शिवसेनाप्रमुखांनी आम्हाला कधीच शिकवलं नाही. आमचं हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व आहे.मिंध्यांना शरम वाटली पाहिजे, माझा महाराष्ट्र इकडे ओरबाडला जात असताना तुम्ही दिल्लीश्वरांच्या पायासमोर लोटांगण घालताय? 'जय जिजाऊ, जय शिवराय' हे नातं काय आहे हे दाखवायचं असेल, तर गद्दारांना येणाऱ्या निवडणुकीत पाडावंच लागेल. समोर कितीही भला मोठा शत्रू असला, तरी आपला राष्ट्राभिमान लाचारीसारखा त्यांच्या पायावर वाहून टाकायचा नाही, असे ते म्हणाले.

# आगामी लोकसभा निवडणूक शांततेत व नि:पक्षपाती होण्यासाठी

## कठोर उपाय योजना करा-जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे

**आष्टी | प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणूक शांततापूर्ण वातावरण आणि नि:पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी महसूल आणि पोलीस प्रशासनाने कठोर उपाय योजना कराव्यात अशा सक्त सूचना जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी दिल्या आहेत .आष्टी तहसील कार्यालयामध्ये आयोजित सर्व खाते प्रमुखांच्या बैठकीमध्ये त्या बोलत होत्या .

आगामी लोकसभा निवडणूक कालावधीमध्ये आणि निवडणूक प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त मतदारांनी सहभाग नोंदवावा मतदान अत्यंत पवित्र असा हक्क असून तो सर्व घटकांनी बजावावा मतदाना ऐवजी सुट्टी मध्ये सहलीला जाण्यास टाळावे आणि मतदान उपस्थित रहावे असे आवाहन करून त्यांनी सर्व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भारत निवडणूक आयोगा नुसार असलेल्या आदर्श आचारसंहिते चे काटेकोर पालन करावे महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने ही निवडणूक अत्यंत शांततामय वातावरणात आणि नि:पक्षपातीपणे पार पडावी यासाठी कठोर उपाय योजना कराव्यात अशा सूचना दिल्या. आचार संहिता लागू झाल्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत असलेल्या सर्व शस्त्रास्त्र परवाने धारकांची अग्निशस्त्रे पोलीस ठाण्यात तात्काळ जमा करावीत असे सांगून याबाबत अत्यंत दक्ष राहण्याचे आदेश दिले आष्टी येथे आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी ३९ बीड सार्वत्रिक लोकसभा निवडणूक अंतर्गत २३१ आष्टी विधानसभा मतदारसंघात अंतर्गत निवडणूक प्रक्रियेतील आणि नियुक्त केलेल्या विविध टीम यांची संयुक्त बैठक घेऊन सर्व कर्मचारी आणि पथक प्रमुख यांना निवडणूक प्रक्रिये बाबत मार्गदर्शन केले .आष्टी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारती मधील नियोजित मतदान पेट्या ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमची पाहणी करून समाधान व्यक्त केले त्यानंतर जिल्हाधिकारी दीपा मुधोळ



मुंडे यांनी आष्टी तालुक्यातील पाणीसाठा असलेल्या प्रकल्पांची पाहणी करून अवैध पाणी उपसा बंद करण्याचे आदेश दिले त्या अगोदर आष्टी तहसील कार्यालयात प्रवेश करताच त्यांनी थेट प्रवेश करून त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांना अत्यंत आस्थेवाईकपणे चौकशी करून विचारले की, तुम्ही अर्ज दिल्यानंतर किती दिवसांनी प्रमाणपत्र मिळते ? अशी चौकशी केली असता त्यावर उपस्थित त्यांनी अभिलेख विभागातील कर्मचारी याबाबत अत्यंत संवेदनशील तात्काळ कागदपत्रांची पूर्तता केली जाते याबाबत समाधानी असल्याचे सांगितले .या बैठकीसाठी पाटोदा उपविभागीय अधिकारी प्रमोद कुदळे,आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर,आष्टीचे तहसीलदार प्रमोद गायकवाड, नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, निवडणूक विभाग अव्वल कारकून राजेंद्र पवार,पाटोद्याचे तहसीलदार दत्तात्रय निलावाड, आणि शिरूर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार बाळासाहेब खेडकर आष्टीचे सपोनि विजय नरवाडे,सपोनि विक्रांत हिंगे, विशेष शाखेचे सद्दाम शेख, तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे यांचे सह विविध कार्यालयाचे खाते प्रमुख उपस्थित होते .

# विधी सेवा समिती पाटोदा व वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध विषयांवरील शिबीर संपन्न


**पाटोदा | प्रतिनिधी**

विधी सेवा समिती पाटोदा व वकील संघ पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१/०३/२०२४ रोजी दिवाणी न्यायालय पाटोदा येथे सार्वजनिक उपयोगिता सेवा/शासकीय योजना, पाणी साठवण आणि जलसंधारण+ अन्न आणि शिक्षणाचा अधिकार (Public Utility Services/ Government Schemes, Water Harvesting and Water Conservation d Right to food and Education) इत्यांदी विषयांवर शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रम प्रसंगी मा.दिवाणी न्यायाधीश पाटोदा, श्रीमती एस.एन.निकम या अध्यक्षस्थानी होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम होत्या. तसेच पंचायत समिती कार्यालय पाटोदा येथील गटविकास अधिकारी श्री.जी.व्ही.बागलाणे हे प्रमुख वक्ते व पाहुणे म्हणून या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमात वकील संघातील विधिज्ञ श्री एस.बी.थोरवे यांनी अन्न आणि शिक्षणाचा अधिकार (Right to food and Education) या विषयी माहिती सांगितली. या वेळी बोलताना गटविकास अधिकारी यांनी सार्वजनिक उपयोगिता सेवा/सरकारी योजना, पाणी साठवण आणि जलसंधारण (Public Utility Services/Government Schemes, Water Harvesting and Water Conservation) या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच विस्तार अधिकारी श्री बी.एस.राख यांनी पाणी साठवण आणि जलसंधारण (Water Harvesting and Water Conservation) या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रस्ताविक विधिज्ञ श्री.एस. बी.जावळे यांनी केले. या कार्यक्रमात सरतेवेळी विधिज्ञ श्री.एस. बी.जावळे यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त करुन कार्यक्रमाची सांगता केली. सदर कार्यक्रमास मा.श्रीमती एस.एन.निकम मॅडम (दिवाणी न्यायाधीश पाटोदा), मा.श्रीमती ए.ए.पाटील (सह दिवाणी न्यायाधीश पाटोदा) तसेच पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष श्री.एस.एस.कोठेकर, गटविकास अधिकारी श्री. जी.व्ही. बागलाणे, विस्तार अधिकारी श्री.बी.एस.राख व पाटोदा वकील संघाचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडचे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे व पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची बदली करा–वसंत मुंडे

**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र मध्ये लोकसभा निवडणुकी संदर्भात आचारसंहिता लागू झालेली आहे. बीडच्या जिल्हाधिकारी श्रीमती दिपा मुंडे–मुघोळ ह्या पदावर कार्यरत असून त्यांचे सासर कन्हेरवाडी, ता. परळी, जि. बीड मतदार संघातील असून देशामध्ये लोकसभेच्या निवडणुका चालु झाल्या आहेत. बीड लोकसभा मतदार संघा अंतर्गत परळी विधानसभा मतदारसंघात श्रीमती मुंडे जिल्हाधिकारी यांचे गाव आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या काळात जिल्हाधिकारी पदावर काम पहाता येत नाही. आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. तसे आदेश आचारसंहिते संदर्भात मार्गदर्शन सुचना व राजपत्र निर्गमित केलेले आहेत. कारण त्यांच्या कार्यकालामध्ये बीड मध्ये मोठी



दंगल होऊन लोकप्रतिनिधींच्या घरावर हल्ले झाले, घरे जाळली, बेकायदेशीरपणे अनेक ठिकाणी परवानगी नसताना आंदोलने, बॅनरबाजी चालु असून सर्व नियमबाह्य कामे प्रशासनाला धरुन चालु आहेत. श्री. नंदकुमार, पोलीस अधिक्षक, हे अकार्यक्षम अधिकारी आहेत, बीड संवेदनशील लोकसभा मतदार संघ असून दंगल झाली त्यावेळेस पोलीसांनी बघ्याची भुमिका घेतली आहे. बेकायदेशीरपणे नंबर २ चे धंदे चालु आहेत, आचारसंहितेचा सर्वस्तरामध्ये बीड जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक मार्फत कायद्याचे उल्लंघन होत आहे, कायद्याचे नियंत्रण नाही, सत्ताधाऱ्याबरोबर त्यांचे लागेबंधे आहेत. निवडणूक ही अटीतटीची असून अकार्यक्षम दोन्ही अधिकारी असल्यामुळे त्यांचे तात्काळ बदल्या करण्यात याव्यात अशी मागणी मा. मुख्य निवडणूक आयुक्त भारत सरकार नवी दिल्ली , मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्याकडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# एका व्याकूळ झालेल्या हरणीला शेतकऱ्यांनी दिले जीवनदान

**परतूर | प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील सातोना खुर्द येथील असून श्रीरंग योगाजी वाव्हळ यांच्या शेतात आज सकाळी काही महिला कापूस वेचण्या करिता गेल्या असता त्या महिलांना दुपारच्या वेळेत कापसाच्या पाट्यात एक हरण व्याकूळ अस्वस्त अवस्थेत दिसले .लगेच त्या महिलांनी त्या शेत मालकाला कळवले आणि उशीर न करता तो शेतकरी काही सोपत्याना घेऊन ताबडतोब शेतात जाऊन तिथल्या परिस्थितीचा आढावा घेऊन त्या हरनाला मित्रांच्या मदतीने एका बोंद्र्याच्या साह्याने उन्हातून उचलून सावलीत ठेवले




आणि त्या हरनाला पाणी पाजले आणि ते हरण मादा जातीचे होते.विलंब न करता परतूर वण विभाग अधिकाऱ्यांशी संपर्क साधून व त्यांना ह्या गोष्टीची पूर्ण माहिती दिली . व एक ते दिड तासात वण विभागाचे कर्मचारी त्या शेतकऱ्याच्या शेतात आले.त्यांनी पशू वैदिकिय दवाखाना सातोना येथील कर्मच्यारी बाबासाहेब दवंडे यांना बोलावून त्या हरनी चा प्रथम उपचार करून छोटा हाती वाहन बोलावून त्या वनविभाग कर्मचाऱ्यांच्या हवाली करण्यात आले.त्या हरीणचा बाकीचा उपचार पशू वैदिकीय दवाखाना परतूर येथे चालू आहे.त्या दवाखान्यातील कर्मचाऱ्यांशी फोन करून त्या हरीणीची माहिती घेतली असता तर त्या हरणीची तब्बेत अगोदर पेक्षा चांगली आहे. असे कळवण्यात आले .

# नांदेड परभणी व हिंगोली येथे भूकंपाचे धक्के, जीवितहानी नाही

**नांदेड | प्रतिनिधी**

नांदेडकरांची २१ मार्चची सकाळची साखरझोप भूकंपाच्या धक्क्याने खाडकन् उडाली. नांदेडकरांना दिनांक २१ मार्च गुरुवार रोजी सकाळी सहा वाजून आठ मिनिटांनी भूकंपाचा जबरदस्त धक्का जाणवला. इमारतींचा स्लॅबमध्ये गडगडाट व जमिनीमध्ये कंपणे होत असल्याचे प्रथमदर्शनी नागरिकांना जाणवले. त्यानंतर सहा वाजून १९ मिनिटांनी दुसरा थोडासा सौम्य धक्का जाणवल्यामुळे नांदेड शहरातील नागरिकांमध्ये घबराहट निर्माण झाली. त्यामुळे नागरिक रस्त्यावर आले. नांदेड मधील फ्लॅट सिस्टीम मधील रहिवाशांना नेमकी काय होत आहे हे न कळल्यामुळे सर्वांची एकच धांदल उडाली.२१ मार्च रोजी सकाळी ०६:०८:३० वाजता ४.५ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंप मापण यंत्रणेवर दिसुन आली. हिंगोली जिल्ह्य़ातील वसमत तालुक्यात असलेल्या कुरुंदा व दांडेगावच्या उत्तर भागातील रामेश्वर तांड्याच्या उत्तर भागात भूकंपाचे केंद्र असल्याचे दिसून आले. याची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे.

लगेचच दुसरा हलका धक्का पहिल्या धक्क्यानंतर अकरा मिनिटांनी म्हणजे सकाळी ०६:१९:०५ वाजता ३.६ रिश्टर स्केल चा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंप मापण यंत्रणेवर दिसुन आली. मात्र या भूकंपाचे केंद्र तिन किलोमीटर दक्षिणेला असलेल्या कुरुंदा व दांडेगावच्या रामेश्वर तांड्याच्या दक्षिण भागात असल्याचे दिसून आले. याही भूकंपाची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे.नांदेड शहर व तसेच अर्धापूर, मुदखेड, नायगाव, देगलूर, बिलोली या तालुक्यातून आज दिनांक २१ मार्चला सकाळी ०६:०९ व ०६:१९ मिनिटांनी दोन वेळा भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, मात्र सतर्क रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने अधिकृतरित्या दिलेल्या वृत्तानुसार या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केल वर अनुक्रमे ४.५ व ३.६ अशी नोंदविण्यात आलेली आहे.भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील जांब गावात असून नांदेड व परभणी जिल्ह्यात या भूकंपाचे धक्के जाणवले असल्याची माहिती नियंत्रण कक्षास प्राप्त झालेली आहे. नांदेड जिल्ह्यात जाणवलेले धक्के सौम्य स्वरूपाचे असून कुठेही नुकसान झालेले नाही. तरी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी त्वरित दगड काढून घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.मराठवाड्यातील १९९३ च्या भूकंपानंतरचा हा सर्वात मोठा आहे. यावेळेस हिंगोली नांदेड परभणी जिल्ह्यातील अनेक ठिकाणी या भूकंपाचे धक्के बसल्याचे फोन आले. श्रीनिवास औंधकर, संचालक, एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .